# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०२/०५/२०२४ (गुरूवार) दुपार

---

### अवैधरीत्या विदेशी दारुची
### विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०१/०५/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे आदेशाने स्टाफ अवैध दारू विक्री व जुगार बाबतच्या रेड करणेकामी पो.स्टे. खापा हद्दीतील खापा टाउन परिसरात फिरत असता मुखबीरद्वारे खबर मिळाली की, बस स्टँड खापा समोरील धनश्री बार येथे एक ईसम अवैधरीत्या विदेशी दारूची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून धनश्री बार खापा येथे जावुन रेड केली असता तेथे बारचे परिसरात **आरोपी नामे— अजय दिपक राय, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं. ४, धनश्री बारचे वरील माळयावर बस स्टॉप समोर खापा** हा लोकांना दारू विक्री करीत असतांना दिसुन आला. त्याची झडती घेतली असता आरोपीकडुन १) Officers Choice BLUE असे लेबल असलेल्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या ९ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती १३५०/— रू. २) Mc Dowells No. 1 असे लेबल असलेल्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या ६ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती ९००/— रू. ३) Mc Dowells No. 1 असे लेबल असलेल्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या २ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती १६०/— रू. ४) ROYAL CHALLENGE असे लेबल असलेल्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या ३ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती २२५/— रू. ५) ICONiQ WHITE असे लेबल असलेल्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या ८ प्लास्टिकच्या सिलबंद निपा एकुण किंमती ७२०/— रू. ६) ROYAL STAG असे लेबल असलेल्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या ८ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती ७६०/— रू. ७) IMPERIAL BLUE असे लेबल असलेल्या प्रत्येकी १८० मिली क्षमतेच्या विदेशी दारूने भरलेल्या २ काचेच्या सिलबंद निपा एकुण किंमती ३६०/— रू. असा एकुण ४४७५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूद्ध कलम ६५ (ई) म.दा.का. प्रमाणे अन्वये होत असल्याने **आरोपी नामे— अजय दिपक राय, वय ४४ वर्ष, रा. वार्ड नं. ४, धनश्री बारचे वरील माळयावर बस स्टॉप समोर खापा** याचेविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, सफौ संजय उकंडे, मपोहवा संगिता कोवे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, महिला पोलीस अंमलदार अश्विनी वांढरे यांनी पार पाडली.

**अवैधरीत्या देशी दारुची**
**वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध**
**नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई**

दिनांक ०१/०५/२०२४ रोजी पोस्टे केळवद येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता मुखबीरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, एक इसम मोटरसायकलवर अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून स्टाफने मौजा ढालगावखैरी येथे नाकाबंदी केली असता **आरोपी नामे— महेश रामकृष्ण डोबाडे वय २२ वर्ष रा. कोदेगाव तह. सावनेर ह. मु. रेमंड कॉलनी ता. सावनेर** याने आपल्या ताब्यातील निळया रंगाची अॅक्टीवा मोपेड गाडी क्र. एम एच.— ४०/ सी बी ७२८६ गाडीच्या डीक्कीमध्ये १५ नग देशी दारू च्या १८० एम एलच्या निपा किंमती १०५०/—रू. चा मुद्देमाल अवैद्यरीत्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीकडुन असा एकुण वाहनासह ५१०५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ) म.दा.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि राकेश साखरकर, पोहवा सुधिर यादगिरे, नापोशि होमेश्वर खडसे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर